**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा, तालुका व प्रभागस्तरावरील पदांसाठी अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना**

१. उमेदवारांची निवड अभियाने निश्चित केलेले पात्रता निकष व पध्दतीच्या माध्यमातून करण्यात येईल.
२. सामाजिक प्रवर्ग, महिला व अपंगांना आरक्षण लागू राहील.
३. प्राप्त अर्जांची छानणी करुन पुढील निवड प्रकियेसाठी पात्र उमेव्दारांची यादी www.jobs.msrlm.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी पुढील सूचनांसाठी संकेस्थळास नियमित भेट द्यावी.
४. शासकीय / बँक अधिकारी / कर्मचारी वरील पदांसाठी अर्ज करु शकतील. त्यांना प्रतिनियुक्तीसाठी शासनाचे नियम लागू राहतील. जे उमेद्वार निवड प्रकियेसाठी पात्र ठरतील; त्यांची निवड प्रकिया इतर उमेदवारांप्रमाणे स्पर्धात्मक स्वरुपाची असेल.
५. सेवानिवृत्त बँक अधिकारी जिल्हा व तालुका व्यवस्थापक - वित्तीय समावेशन (Financial Inclusion) या पदासाठी अर्ज करु शकतील.
६. वरील सर्व पदे हे ग्रामीण भागात काम करण्यासाठी नेमण्यात येत असून त्यांना मोठ्याप्रमाणात क्षेत्रकार्य करावे लागणार आहे.
७. जिल्हा व तालुकास्तवरील पदांसाठी लेखी परीक्षा, गटचर्चा व मुलाखत; तसेच क्लस्टर कोऑर्डिनेटर पदासाठी लेखी परीक्षा, क्षेत्रकार्य व सादरीकरण आणि मुलाखत या आधारे उमेव्दारांची निवड करण्यात येईल.
८. अर्जांच्या छानणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना पुढील निवड प्रकियेसाठी बोलाविले जाईल. निवड प्रकियेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी त्यांचे Hall ticket डाऊनलोड करण्यासाठी संकेतस्थळास भेट द्यावी.
९. सदरील निवड प्रकियेबाबत कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता अभियानाच्या गरजेनूसार निवड प्रकिया रद्द करणे / त्यामध्ये दुरुस्ती करणे, पदांच्या संख्येत बदल करणे, पात्रता निकषांमध्ये दुरुस्ती/बदल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी राखून ठेवले आहेत.
१०. सर्व पदे कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीसाठी, करार तत्वावर भरण्यात येत असल्याने शासनाच्या सेवेत कधीही कायम होणार नाहीत. कामाची प्रगती पाहून व अभियान व्यवस्थापनाच्या निर्णयानूसार पुढील मुदतवाढ देण्यात येईल.
११. उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी शेवटच्या दिवसाची वाट पाहू नये, जेणेकरुन संकेतस्थळावर *‘लोड’* वाढणार नाही.

## Important Notes for candidates those who want to apply for the District, Block and Sub-Block level positions

1. ‘The selection of the candidates will be based purely on track record of the candidates and eligibility criteria prescribed by the mission.
2. Reservations will be applicable for Social category, Women, and Persons with Disability (PwD).
3. The list of shortlisted candidates will be published on the www.jobs.msrlm.org. Applicants are requested to visit the website regularly for all further notifications.
4. Government and Bank employees are also encouraged to apply. Relevant deputation norms would be applicable for them. If shortlisted, they would undergo the same selection process as other candidates.
5. Retired bank officers can apply for Financial Inclusion position at district and block level.
6. All positions are required to work in rural area which requires extensive field visits.
7. Selection procedure for district and Block level positions will involve written test, group discussion and personal interview & Candidates applying for Cluster Coordinator positions will also go through written test, field immersion and personal interview.
8. Only shortlisted candidates will be called for selection process. All shortlisted candidates are requested to visit the website to download the hall ticket for written test.
9. The CEO, MSRLM reserves the right to modify /cancel the recruitment process without assigning reasons, to modify/amend the eligibility criteria and number of positions without prior notice depending on the mission requirement.
10. All positions offered are on contractual basis for an initial period of 11 months and do not imply permanency in Government service in any way. Positions will be renewed based on performance and management discretions.
11. We recommended that you apply as soon as possible before the application deadline; it will be helpful to reduce the load on server.